| | | |
|---|---|---|
| | महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना नाशिक<br>कंत्राटी पदभरती प्रक्रिया<br>जाहिरात क्र.०१/२०२६ | |

# कंत्राटी पदभरती जाहिरात २०२६

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत निव्वळ कंत्राटी तत्वावर ११ महिण्याकरीता पुढील पदे भरण्याकरीता अटी व शर्तीच्या अधिन राहून पदभरती करण्याबाबत प्रक्रिया आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र | पदनाम | एकुण रिक्त पदे | रिक्त ठिकाण | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कामाचा अनुभव | प्रतीमाह मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकिय समन्वयक (Medical Co-Ordinator) | ०१ | जिल्हा रुग्णालय, नाशिक | BAMS<br>MSCIT | AB-PMJAY /MJPJAY /AYUSH/NHM/RBSK/IPHS, आरोग्य योजना किंवा समकक्ष आरोग्य योजनेमध्ये सदर पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. | रु.२८०००/- |
| ०२ | डाटा एन्ट्री ऑपरेटर (Data entry operator) | ०१ | जिल्हा रुग्णालय, नाशिक | Any Graduate<br>MSCIT Certificate<br>Typing English ४०, Marathi ३० | AB-PMJAY/MJPJAY /AYUSH/NHM/RBSK/IPHS, आरोग्य योजना किंवा समकक्ष आरोग्य योजनेमध्ये सदर पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. | रु.१८०००/- |
| ३ | डीइओ कम अकॉटट ( DEO cum Accountant) | ०१ | जिल्हा रुग्णालय, नाशिक | Any Graduate<br>MSCIT Certificate<br>Typing English ४०, Marathi ३०<br>Tally | AB-PMJAY/MJPJAY /AYUSH/NHM/RBSK/IPHS, आरोग्य योजना किंवा समकक्ष आरोग्य योजनेमध्ये सदर पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. | रु.१८,०००/- |

अटी व शर्ती :-

१) उपरोक्त पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन वरील तीन्ही पदांकरीता नेमणूक ही फक्त ११ महिण्याकरीता करार तत्वावर अटी व शर्ती नुसार करण्यात येईल.

२) जाहिराती मधिल पदे ही राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील करार तत्वावरील मानधनावर आधारीत आहेत, त्यामुळे सदर पदावर स्थायी/कायम करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

३) सदर पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत तसेच नेमणुक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-याला शासकिय सेवेत नियमित सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्याकरीता दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

४) सदर पदांवर फक्त ११ महिण्याकरीता कंत्राटी तत्वावर तात्पुरती नेमणूक देण्यात येऊन त्यांना वरील पदानुसार ठरविण्यात आल्याप्रमाणे निश्चित दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल व त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते किंवा मानधन वाढ देण्यात येणार नाही.

५) उपरोक्त जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल किंवा रिक्त ठिकाणामध्ये बदल करण्याचा तसेच जातनिहाय पदांच्या संख्येमध्ये (आरक्षणामध्ये ) बदल करण्याचा अधिकार जिल्हास्तरीय मज्योफुजआ योजनेच्या निवड समितीला आहेत.

६) मज्योफुजआ योजना कंत्राटी पदभरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद करणे/भरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मज्योफुजआ योजनेच्या जिल्हास्तरीय निवड समितीच्या अध्यक्ष यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

७) मज्योफुजआ योजनेचा शासन निर्णय दि.११.०१.२०१९ च्या आदेशात नमुद सुचनेप्रमाणे योजनेकरीता कंत्राटी कर्मचारी यांची निवड ही जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिण्याच्या करार पदधतीवर आधारीत असल्याने सदर कर्मचारी यांचे वेतन विमा कंपनीकडून प्राप्त होणा-या निधीच्या ४० टक्के मधून खर्च करण्यात येईल.

८) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सदय अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना दि.०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासकिय सेवेत नियुक्ती झालेल्या उमेदवारांस नविन "परिभाषित अंशदान निवृत्ती योजना" लागू राहणार नाही तसेच किंवा त्यावर कोणाताही हक्क मागता येणार नाही.

९) कंत्राटी उमेदवाराला नेमणूक देण्यात आल्यानंतर, सेवेबाबत अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे १०० रुपयांच्या (बॉन्ड) मुद्रांक पेपरवर शपथपत्र (ॲफीडेविट) विहित नमुन्यात ७ दिवसांच्या आत निवड समितीकडे सादर करावे लागेल.

१०) कंत्राटी उमेदवारांच्या काही अडचणी किंवा तक्रारी असल्यास ते ज्या संस्थेत कार्यरत आहेत त्या संस्थेच्या संस्था प्रमुखांकडे रितसर लेखी विनंती करावी लागेल, तसेच संस्था प्रमुखांच्या पुर्व परवानगी शिवाय कर्मचा-याला कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही किंवा त्यांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणत्याही पत्रकार / मिडियाकडे जाता येणार नाही.

११) कंत्राटी उमेदवाराला नियुक्ती देण्यात आल्यानंतर त्यांच्या चारित्र्य व वर्तणूकीबाबत राजपत्रित अधिकारी -अ/ब यांचेकडील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१२) सदर कंत्राटी पदभरतीबाबत कोणत्याही उमेदवारास मुलाखतीस/कागदपत्रे पडताळणीस येण्या-जाण्याकरीता कोणत्याही प्रकारचा दैनिक व प्रवासभत्ता देय राहणार नाही.

१३) सदर भरती प्रक्रियेकरीता पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी जिल्हा रुग्णालय,नाशिक जि. नाशिक यांचे कार्यालयाचे नोटिस बोर्डवर प्रसिदध करण्यात येईल. (त्याबाबत उमेदवारास स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.)

१४) उमेदवाराने अर्ज दाखल केल्यानंतर नियुक्ती मिळविण्यास दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांचा अर्ज बाद करुन त्याचेविरुध्द कार्यवाही करण्यात येइल.

१५) उमेदवारांची पुर्वीच्या कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकिय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा त्यांचे विरुध्द फौजदारी गंभीर गुन्हा अथवा न्यायालयीन प्रकरणी दावा चालु असल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१६) उमेदवाराने अर्ज दाखल करतांना नोंदविण्यात आलेली शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव प्रमाणपत्र यांच्या मुळ प्रती कागदपत्रे पडताळणी वेळी सादर करावे लागेल अन्यथा उमेदवाराला निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१७) वैद्यकिय समन्वयक (Medical Co-Ordinator) या पदाकरीता तत्सम महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे नोंदणी/नुतनीकरण असलेले प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

**१८) राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांना लागु असलेले वेतनवाढ किंवा वेतन सुसूत्रिकरण प्रक्रिया बाबतचे कोणतेही नियम सदर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजेनेच्या कर्मचा-यांना लागू होणार नाहीत.**

१९) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, राज्य हमी सोसायटी वरळी मुंबई, यांच्या मार्गदर्शनाखालील सुचनांचे पालन करुन सदर कंत्राटी पदभरती अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांची निवड फक्त ११ महिण्याकरीता तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येईल व उमेदवारांच्या नियुक्ती दिनांकापासुन ११ महिण्यानंतर त्यांचे आदेश आपोआप संपुष्टात येईल.

२०) महाराष्ट्र नागरी सेवा, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियम२००५, (महाराष्ट्र शासन परिपपत्रक क्रं.एस.आर.व्ही-२०००/प्र.क्रं.१७/२०००/२०१२, दिनांक ०१/०७/२००५) नुसार नियुक्ती मिळाल्यानंतर लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

२१) अंतिम निवड झाल्यानंतर उमेदवाराला त्यांचे शारीरिक व मानसिकदृष्टया पात्र असल्याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

२२) उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यास मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

२३) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहार विचारत घेतला जाणार नाही.

२४) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झाल्यावर भविष्यात जर नियुक्त कर्मचाऱ्याने राजीनामा दिलेमुळे सदर जागा रिक्त झाल्यास प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया नकरता नियुक्ती आदेश दिले जातील

२५) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची सुन ११ महिने कालावधीसाठी भरण्यात येणार असुन पुढील पुनर्नियुक्ती (११ महिने कालावधीकरीता) आपल्या कामगिरी मुल्यांकनावर आधारीत असेल.

२६) केंद्र / राज्य शासनाने सदरची पदे नामंजुर केल्यास उमेदावाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

२७) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई मेल आयडी अचुक नोंदवावा तसेच भरती प्रक्रिया पुर्ण होई पर्यत सुस्थित राहील याची दक्षता घ्यावी.

२८)विहित नमुन्यातील अर्ज नसल्यास, अपुर्ण अथवा अर्धवट भरलेला असल्यास नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवाराची राहील या बाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

- **वयोमर्यादा** - सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं.एसआरव्ही२०१५/प्र.क्र.४०४/कार्या-१२, दि.२५/०४/२०१६ नुसार सर्व उमेदवारांसाठी जाहिरातीच्या दिवशी वरील तीन्ही पदांकरीता किमान वयोमर्यादा १८ वर्षे पुर्ण व कमाल ३८ वर्षे पर्यंत राहील. (मागासवर्गीय उमेदवाराकरीता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे).
- **परिक्षा शुल्क** - सदर भरती प्रक्रियाकरीता अर्ज दाखल करतांना कोणतेही परिक्षा शुल्क आकारले जाणार नाहीत. (सर्व प्रवर्गाकरीता परिक्षा शुल्क माफ आहे)
- **अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया** -
  - विहीत नमुन्यातील अर्ज.
  - आधार कार्ड झेरॉक्स
  - जन्माचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला
  - जात प्रमाणपत्र / जात वैद्यता प्रमाणपत्र
  - रहिवासी दाखला / अधिवास प्रमाणपत्र
  - शैक्षणिक अर्हतेबाबतचे सर्व गुणपत्रकांच्या प्रती (१०वी, १२ वी व पदवी शिक्षण.)
  - अनुभव प्रमाणपत्र
  - महाराष्ट्र मेडिकल कौन्सीलचे नोंदणी प्रमाणपत्र (डॉक्टरांचे)
  - नावत बदल असल्यास महाराष्ट्र शासनाचे गॅझेट
  - वैध कालावधीचे नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र
  - पासपोर्ट आकाराचे २ फोटो.

प्रत्येक पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेसह स्वतंत्र अर्ज करावा लागेल. (एका पदांकरीता फक्त एकच अर्ज करता येईल, २ अर्ज केल्यास अर्ज बाद करण्यात येईल.)

अर्ज फक्त ऑफलाईन पदधतीने (पोस्टाने/स्वहस्ते) स्वीकारले जातील. अर्जावरील लिफाप्यावर ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पदनाम व महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना कंत्राटी पदभरती -२०२६ असे लिहावे.

अर्ज पाठविण्याचा पत्ता- प्रति, जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांचे नावे, प्रशासकिय कार्यालय, जिल्हा रुग्णालय नाशिक, शरणपुर रोड,नाशिक जि. नाशिक पिन-४२२००२ या पत्त्यावर विहीत वेळेत पाठविण्यात यावेत.

- **पदभरतीबाबत सुचना, जाहिरात तसेच अर्जाचा नमुना व निकालाबाबत सर्व माहिती जिल्हा रुग्णालय,नाशिक जि. नाशिक यांचे कार्यालयाचे नोटिस बोर्डवर प्रसिदध करण्यात येईल व मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अधिकृत संकेतस्थळावर - www.nashik.gov.in , यावर वेळोवेळी प्रसिदध करण्यात येईल. (उमेदवाराला याबाबत कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही)**
- **निवड प्रक्रिया** -

पुढील प्रमाणे उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व त्यांच्या अनुभव प्रमाणपत्रानुसार गुणांची विभागणी करण्यात येईल.

पदनाम – वैद्यकिय समन्वयक (Medical Co-Ordinator)

| शैक्षणिक अर्हता | अंतिम वर्षाच्या एकुण मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीचे (Proportion = मिळालेल्या गुण * ५०/१००) | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (पदाशी संबधित) Proportion = मिळालेल्या गुण * २०/१०० | शासकिय/अर्धशासकिय एनएचएम अनुभव (प्रत्येक वर्षासाठी ६ मार्क ) जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत |
|---|---|---|---|
| BAMS, MSCIT | जास्तीत जास्त ५० गुण | जास्तीत जास्त २० गुण | जास्तीत जास्त ३० गुण |

पदनाम – डाटा एन्ट्री ऑपरेटर (Data entry operator)

| शैक्षणिक अर्हता | अंतिम वर्षाच्या एकुण मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीचे (Proportion = मिळालेल्या गुण * ५०/१००) | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (पदाशी संबधित) Proportion = मिळालेल्या गुण * २०/१०० | शासकिय/अर्धशासकिय एनएचएम अनुभव (प्रत्येक वर्षासाठी ६ मार्क ) जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत |
|---|---|---|---|
| Any Graduate MSCIT Certificate Typing English ४०,Marathi ३० | जास्तीत जास्त ५० गुण | जास्तीत जास्त २० गुण | जास्तीत जास्त ३० गुण |

पदनाम – डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अकाऊंटंट (Data Entry Operator Cum Accountant)

| शैक्षणिक अर्हता | अंतिम वर्षाच्या एकुण मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीचे (Proportion = मिळालेल्या गुण * ५०/१००) | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (पदाशी संबधित) Proportion = मिळालेल्या गुण * २०/१०० | शासकिय/अर्धशासकिय एनएचएम अनुभव (प्रत्येक वर्षासाठी ६ मार्क ) जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत |
|---|---|---|---|
| Any Graduate MSCIT Certificate Typing English ४०,Marathi ३० | जास्तीत जास्त ५० गुण | जास्तीत जास्त २० गुण | जास्तीत जास्त ३० गुण |

वरील प्रमाणे सर्व प्राप्त अर्जानुसार सर्व उमेदवारांची एकत्रित यादी करण्यात येईल.

**कंत्राटी पदभरती वेळापत्रक -**

| अनु क्रं. | तपशिल | विहित कालावधी |
|---|---|---|
| ०१ | कंत्राटी पदभरती जाहिरात प्रसिदध करणे | दि.२२/०४/२०२६ |
| ०२ | ऑफलाईन अर्ज दाखल करण्याचा कालावधी | दि.२२/०४/२०२६ ते दि.३०/०४/२०२६ |
| ०३ | ऑफलाईन (पोस्टाने) अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. ३०/०४/२०२६ सायं ५.०० वाजेपर्यंत |
| ०४ | उमेदवारांची गुणानुक्रमाने यादी तयार करुन व यादी संकेतस्थळावर प्रसिदध करणे | दि. /०५/२०२६ |
| ०५ | अंतिम निकाल प्रसिदध करणे. | दि. /०५/२०२६ |

दिनांक - १७/०४/२०२६

ठिकाण —जि.रु.नाशिक

सदस्य सचिव
निवड समिती तथा जिल्हा शल्य चिकित्सा
महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना नाशिक

अध्यक्ष
निवड समिती तथा मा.उपसंचालक
आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक

| Application No.: (Office Use only) | |
|---|---|

**MAHATMA JYOTIRAO PHULE JAN AROGYA YOJANA, NASHIK**

STICK RECENT PHOTO HERE

**Year 2026-27 (AdvertisementNo.01/2026)**

# Application Form

**Applying Post Name:-** ________________________________________

(All fields in the forms are mandatory to be filled an Incomplete form submitted will be treated as rejected)

<table>
<tr><td colspan="3">Name:</td></tr>
<tr><td colspan="3">Father's/Husband's Name:</td></tr>
<tr><td>Date of Birth:<br><table><tr><td>DD</td><td>MM</td><td>YYYY</td></tr><tr><td></td><td></td><td></td></tr></table></td><td>Blood Group:</td><td>Gender:<br><br>Marital status:</td></tr>
<tr><td>Age :</td><td>Existing NHM/MJPJAY Employee (Yes/No)</td><td>Nationality:</td></tr>
<tr><td colspan="2">Original Category:</td><td>Caste Certificate/Validity Attached: Yes/No</td></tr>
</table>

**Address/Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)**

| |
|---|
| Address:<br><br>State<br><br>Pin:<br><br>**Contact No (Whatsapp) :** |
| **E-Mail Id Correspondence:** |

Academic/Professional Educational all summary :( Starting form most recent)

| Year | Educational Qualification Degree/ Diploma | University/ Institute | Final Year Total Marks & Obtained Marks | Final Year Percentage (%) | Grade |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**Note–CGPA/SGPA/Grade Points conversion in percentage should be provided by candidate from respective university/college signed copy.**

**Work/Experience Summary: (Starting form current/most recent)**

| Sr. No | Form (MM/YY) | To (MM/YY | Total period In Years & Months | Organization | Designation | Responsibilities (Min.30&Max.50 Words) | Experience e certificate Out word no., Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Government Experience:** | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| **Semi-Government Experience:** | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| **Private Experience** | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

| | |
|---|---|
| **Total Experience**(In Years &Months):<br>**A) Government:**<br>**B) Semi Government:**<br>**A) Private:** | Relevant Experience to the post applied (In Years & Months):<br>**A) Government:**<br>**B) Semi Government:**<br>**A) Private:** |

| | |
|---|---|
| **Computer Proficiency**:<br>**Tally**: | |
| **Typing Skill :** | MarathiTyping30wpm(Yes/No):<br>EnglishTyping40wpm(Yes/No): |

**Declaration**:

I hereby declare that all statements made in the application are true, Complete and correct to the best of my knowledgeandbelief.Iunderstandthatintheeventofanyinformationbeingfounduntrue/false/incorrect or I do satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.

**Name:**

**Place:**

**Signature**

**(OFFICEUSEONLY)**

**Remark:-**________________________________________

**Name of Authority:-**______________________**Signature of Authority:-**____________________

## प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ......................................................................

श्री...........................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,.....................................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ............................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ...............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-